Estd.1962
NAAC 'A' Grade

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004 MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2609000 परीक्षक नियुक्ती विभाग 2609102, 2609103,
PHONE : EPABX-2609000, APPOINTMENT SECTION 2609102, 2609103
Website : www.unishivaji.ac.in
E-mail:appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in

*Ref. No.*:- शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/2758 दिनांक /06/2018

12 JUN 2018

प्रति,

मा.प्राचार्य/प्राचार्या/संचालक/अधिविभागप्रमुख,

सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था, विद्यापीठ अधिविभाग

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषयः परीक्षा खर्चासाठी देण्यात आलेल्या अग्रीम समायोजनाचे प्रस्ताव त्वरीत सादर करणेबाबत.**

**संदर्भः शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/18 दिनांकः 29/01/2018 रोजीचे पत्र.**

महोदय/महोदया,

आपणांस विदित आहेच की, परीक्षांची पूर्व तयारी व प्रत्यक्ष परीक्षांकरिता आलेला खर्च याचे समायोजन करणेसाठी विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयान्वये/धोरणाने सर्व महाविद्यालयांना परीक्षा कामकाजाच्या खर्चासाठी अग्रीम दिला जातो. तसेच सदर परीक्षाविषयक बाबी पूर्ण झालेनंतर विहीत कालावधीमध्ये, विहित नमून्यातील उपयोगिता प्रमाणपत्र आणि खर्चाचा विनियोग दाखला(जमा व खर्च तक्ता) विद्यापीठाकडे ज्या त्यावेळी सादर करणेबाबतचे निर्देश आहेत. उपयोगिता प्रमाणपत्र आणि खर्चाचा विनियोग दाखला (जमा व खर्च तक्ता) या दोन्हींवर प्राचार्य आणि सनदी लेखापाल यांची संयुक्त स्वाक्षरी तसेच उपयोगिता प्रमाणपत्रावर खर्चाचा शेवटचा दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ लेखा संहिता – मुद्दा क्र.1.44 नुसार " (c) Payment of remuneration for examination claimed beyond one year from the date of examination results will be considered as lapsed." तथापि, महाविद्यालयाकडून प्राप्त झालेले **मार्च/एप्रिल, 2016 पूर्वीचे प्रस्ताव** निकाली काढण्याकरीता व धोरणात्मक निर्णयासाठी विद्यापीठ अधिकार मंडळासमोर ठेवला असता त्यास विशेष बाब म्हणून मान्यता मिळाली आहे. काही महाविद्यालयांचे मार्च/एप्रिल,2016 पूर्वी आदा केलेल्या अग्रीम रक्कमांचे समायोजन अद्यापही झालेले दिसून येत नाही, त्या महाविद्यालयांनी स्वतःकडे उपलब्ध असलेल्या त्या–त्या वर्षी पाठविलेल्या प्रस्तावाच्या मुळप्रती अथवा फोटोकॉपी त्वरीत या कार्यालयास सादर कराव्यात. तसेच **ज्या महाविद्यालयांना त्यांच्या प्रलंबित अग्रीम रक्कमांमुळे मार्च/एप्रिल, 2017 , ऑक्टो/नोव्हें., 2017 आणि मार्च/एप्रिल, 2018 साठी अग्रीम आदा केलेली नाही, अशा महाविद्यालयांनी आपले उपयोगिता प्रमाणपत्र आणि जमा–खर्च तक्ता तात्काळ सादर करून खर्चाची मागणी करावी आणि ज्या महाविद्यालयांना मार्च/एप्रिल,2018 साठी तसलमात रक्कम आदा केली आहे, त्या महाविद्यालयांनीही आपले समायोजनाचे प्रस्ताव तात्काळ सादर करावयाचे आहेत.**

पुनःश्च आपणास आवाहन करण्यात येते की, मार्च/एप्रिल, 2018 पूर्वीचे प्रलंबित अग्रीम रक्कमेचे तात्काळ समायोजन करण्यात यावेत. तसेच आपण परीक्षा विभागाकडे पाठविलेल्या अग्रीम रक्कमेचे प्रस्ताव जोपर्यंत लेखा विभागाकडून समायोजन होत नाही, तोपर्यंत महाविद्यालयाने सदर प्रस्तावांचा पाठपुरावा करावा. समायोजनासंदर्भातील लेखा विभागाचे पत्र प्राप्त झाल्यानंतरच सदर प्रस्तावाची प्रक्रिया पूर्ण झाली असे समजण्यात यावे.

**उपरोक्तप्रमाणे यापूर्वी अदा करण्यात आलेल्या अग्रीम रक्कमेस अनुसरून परीक्षा खर्चाचे प्रलंबित प्रस्तावांची संपूर्ण पूर्तता ज्या महाविद्यालयांची झालेली आहे, अशाच महाविद्यालयांना पुढील परीक्षांकरीता अग्रीम अदा करता येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबतः वरीलप्रमाणे.